# ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समिती

- आ वा ह न -

बांधवांनो आणि भगिनींनो,

स्थानीय लोकाधिकार समितीच्या चळवळीला यावर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. स्थानिक भुमिपुत्रांच्या भरती, बदली आणि बढतीसाठी हि चळवळ सातत्याने आपल्या मराठी व स्थानिक बांधवांसाठी काम करीत आलेली आहे. चळवळीच्या माध्यमातून तेल कंपन्या, हवाई कंपन्या, संशोधन संस्था, सार्वजनिक व खाजगी बँका, रेल्वे, माझगाव डॉक, अदानी इलेक्ट्रीकल, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, फूड कॉरपोरेशन अश्या अनेक आस्थापनांमध्ये मराठी बांधवांची भरती करण्यात आली. ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समितीने सुध्दा १९८२-८३ साली महासंघाच्या नेतृत्वाखाली आंदोलन करुन भुमिपुत्रांना आपल्या आस्थापनेमध्ये नोकरी मिळवून देण्याचा प्रामाणिक व यशस्वी प्रयत्न केला होता, याचे दृष्य परिणाम आपण पहातच आहात.

स्थानिकांच्या एकजुटीसाठी व या चळवळीचे महत्व समजावून देण्यासाठी स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ वेळोवेळी महाशिबिरांचे आयोजन करीत असते. यापूर्वीचे महाशिबिर जानेवारी २०१९ मध्ये वरळी येथे घेण्यात आले होते. यावर्षी रविवार दि. २८ मे २०२३ रोजी पुन्हा एकदा महाशिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. विविध आस्थापनांमधून सुमारे १५००० प्रतिनिधी या शिबिराला उपस्थित रहाणार आहेत. त्याचबरोबर प्रथमच स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाचा फंड उभा करण्याचे उद्‌दिष्ट्य ठरविण्यात आले आहे. या फंडासाठी आपणा सर्वांकडून आर्थिक योगदानाची अपेक्षा आहे. व हा फंड शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे स्मरणिकेद्वारे उभारत आहोत. सदर स्मरणिकेत सर्वांनी कमित कमी पाव पानाची ₹ २०००/- (रुपये दोन हजार फक्त) ची जाहिरात द्यावयाची आहे असे आवाहन स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ प्रथमच करीत असल्याने आपणा सर्वांच्या पाठिंब्याची व आर्थिक योगदानाची गरज आहे. तरी आपण सर्वजण उत्स्फूर्तपणे सकारात्मक प्रतिसाद द्याल याची आम्हाला पूर्ण खात्री आहे. ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समितीच्या पदाधिकाऱ्यांकडे स्मरणिकेसाठीच्या जाहिरातीचे अर्ज उपलब्ध असून देणगी शुल्कासह जाहिरात देवून आपण सर्वांनी सहकार्य करावे, हि विनंती.

आपले नम्र,

प्रदीप मयेकर,
सरचिटणीस, स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ
सरचिटणीस, ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समिती

संदीप गावडे,
कार्याध्यक्ष, ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समिती